# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६१(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad@dteaharashtra.gov.in

**तात्काळ/अतिमहत्वाचे**

जा.क्रं.विकाऔ/शिक्षण/२०१९/ 920

दिनांक : 15 JAN 2019

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय/शासकीय अनुदानित/विना-अनुदानित

सर्व संस्था

विषय : **महाडीबीटी पोर्टल वर संस्थेच्या लॉगीन मधील तसेच विद्यार्थी लॉगीन मधील अर्जाचा त्वरित युद्धपातळीवर निपटारा करणे बाबत**

सर्व संस्थेच्या प्राचार्यांना सुचित करण्यात येते की महाडीबीटी पोर्टलवर अर्जाची छाननी करून त्यास मान्यता देण्याचे कार्य अंतिम टप्यात आले आहे. आपण आजपर्यंत दिलेल्या सहकार्याबद्दल अभिनंदन. परंतु आजही आपल्या संस्थेच्या लॉगीन मध्ये तसेच आपण विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्ज आपल्या संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या लॉगीन मध्ये आढळून येतात. त्या अर्जाचा त्वरीत युद्धपातळीवर निपटारा करण्यात यावा. त्यासाठी खालील प्रक्रियेचा अवलंब करावा.

(1) संस्थेचा लॉगीन मध्ये मान्यता देण्यासारखे अर्ज तात्काळ निकाली काढून त्यांना मान्यता देण्यात यावी व R.O. Login ला अर्ज पाठविण्यात यावेत.

(2) या अभ्यासक्रमाच्या शुल्क नियामक प्राधिकरणाकडून मान्यता नाही व ज्यांचे शुल्क शुन्य दिसत आहे, असे अर्ज मान्यता देऊन तपासणीसाठी पूढे पाठविण्यात यावेत जेणेकरून कालापव्यव होणार नाही.

(3) विद्यार्थ्यांच्या लॉगिन मधून अर्ज पूढे मान्यतेस्व सादर करण्याबाबत विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरून सूचना देऊन ते तात्काळ संस्थेच्या लॉगिन मध्ये मागविण्यात यावेत व तपासून मान्यता देऊन R.O. कडे पाठविण्यात यावेत.

(4) संस्था स्तरावर तसेच Against CAP प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना लागू नसल्यामुळे सदरील अर्ज आपल्या स्तरावरुन फेटाळण्यात यावेत.

(5) संस्था स्तरावर दररोज आढावा घेऊन संस्थेच्या लॉगिनमध्ये अर्ज शिल्लक रहाणार नाही याची काळजी घ्यावी.

**उपरोक्त प्रक्रियेचा अवलंब करुन युध्दपातळीवर सर्व अर्जाचा निपटारा शुक्रवार दि. १८/०१/२०१९ पर्यंत करण्यात यावा. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ई-मेल व्दारे या कार्यालयास पाठविण्यात यावा.**

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद